# जैन साहित्य

**अर्ध्य ५ वा**

जैन साहित्य खंडात जैन धर्मग्रंथाचा परिचय दिलेला आहे. भारतातील विविध भाषामध्ये जैन धर्मीयांनी कशाप्रकारे मूलभूत साहित्यरचना केलेली आहे व या भाषांमधील साहित्यात जैन साहित्याला कसे महत्वपूर्ण स्थान आहे याचेही विश्लेषण येथे केलेले आहे. जैन धर्मीयांच्या निरनिराळया साहित्यकृतीचे वर्णन करताना या धर्मातील त्या ग्रंथाच्या महत्वाबरोबर, इतर मान्यवर ग्रंथाशी त्याची तुलना, ग्रंथांचे साहित्यिक मूल्यमापन, त्यातील शैलीचे समीक्षात्मक वर्णनही देण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय साहित्यात जैन धर्माच्या साहित्याने कोणती अमोल कामगिरी बजावलेली आहे याचे ज्ञान वाचकांना या खंडाच्या अभ्यासातून मिळेल.

प्राचीन भारतीय साहित्य धार्मिक भावनेने प्रेरित व प्रभावित झालेले आहे. जैन धर्माचे साहित्यही या नियमास अपवाद नाही. जैन धर्म मूलत: अध्यात्मिक आहे. प्रथमपासूनच या धर्माचा संबंध काशी, कोसल इत्यादि पूर्वेकडील प्रदेश व क्षात्रवंशीय राजाबरोबर असलेला दिसून येतो. या पूर्वेकडील प्रदेशातच जैनांच्या बहुसंख्य तीर्थंकारांनी जन्म घेतला आहे. तपश्चर्या केली व केवलज्ञानाची प्राप्ती झाल्यानंतर आपल्या उपदेशाने अखंड प्रवाहित ज्ञानगंगा निर्माण केली, जिचा प्रवाह आजपर्यंत चालू आहे. जैनधर्मीय अंतिम तीर्थकर भगवान महावीरांनी आपला प्रधान गणधर इंद्रभूति गौतम याला जो उपदेश केला तोच उपदेश गौतमाने ग्रंथित केला. तेच प्राचीनतम जैन साहित्य होय.

भगवान महावीर पूर्वकालीन काही जैन साहित्य अस्तित्वात होते किंवा नाही याविषयी निरनिराळी मते आहेत, तथापि साहित्यामध्ये शाब्दिक व रचनात्मक स्वरुप आणि अर्थात्मक व विचारात्मक स्वरुप या दोन तत्वमूल्यांचा अंतर्भाव होतो. या दोन तत्वमूल्यांना जैन परंपरेप्रमाणे द्रव्यश्रुत व भावश्रुत म्हणतात. द्रव्यश्रुत किंवा शब्दात्मक रचना या दृष्टीने भगवान महावीर पूर्वकालीन जैन साहित्य उपलब्ध नाही, पण भावश्रुताच्या अपेक्षेने जैन श्रुतांगातील काही रचना महावीर पूर्वकालीन श्रमण-परंपरेमध्ये प्रचलित होती असे मानण्यात येते.

महावीरोत्तर वाङमयात महावीर पूर्वकालीन विचार-प्रवाह, मतमतांतर, ज्ञान व विज्ञान इत्यादींचक संकलन महावीर शिष्य इंद्रभूती गौतमाने केलेले आहे.

## दिगंबर जैन आगम साहित्य

पूर्व कालामध्ये श्वेतांबर दिगंबर या दोन्ही पंथामध्ये विशेष मतभेद असल्याचे दिसून येत नाही. ज्ञातृपुत्र श्रमण भगवान महावीर द्वारा उपदेशिलेल्या निर्ग्रथं प्रवचनाचेच दोन्हीही पंथ अनुयायी होते. भगवान महावीरांच्या नंतर होऊन गेलेल्या गौतम, सुधर्मा आणि जंबूस्वामी यांना दोन्ही संप्रदायांची मान्यता असल्याचेही दिसते. आचार्य भद्रबाहु यांनाही मानत होते. इ. स. प्रथम शतकातील मथुरेतील जैन शिलालेखावरुन देखील आपणाला याविषयी माहिती मिळते. शिवाय दोन्ही संप्रदायातील जे साहित्य उपलब्ध आहे त्यामध्ये प्राचीन परंपरागत विषय व मरणसमाही, पिंडनिर्युक्ति, आवश्यकनिर्युक्ति, बृहत्कल्पभाष्य इत्यादि ग्रंथातील विषय समान आहेत. परंतु पुढे इ. स. प्रथम शतकाच्या आसपास अचेलत्व, सचेलत्व या प्रश्नावरुन दोन्ही पंथात मतभेद झाले. पुढे आगम साहित्याचा स्वीकार करण्याबाबतही मतभेद झाले.

दिंगंबर पंथाने श्वेतांबर मान्य ४५ आगम ग्रंथांना मान्यता दिली नाही. दिगंबरांच्या मते आगम साहित्य नाहीसे झाले असावे. श्वेतांबराचे आगम साहित्य अर्धमागधी भाषेत लिहिले असून दिगंबर आगम साहित्य शौरसेनी भाषेत लिहिले गेले असल्याचे मानले जाते. दिगंबर संप्रदायानुसार आगमाचे दोन विभाग पाडले जातात- अंगबाह्य व अंगप्रविष्ट, अंगबाह्य या श्रुताचे १४ भेद मानले आहेत. १. सामायिक, २ चर्तुशिति-स्त, ३ वंदना, ४ प्रतिक्रमण, ५ वैनयिक, ६ कृतिकर्म, ७ दशवैकालिक, ८ उत्तराध्यन, ९ कल्प-व्यवहार, १० कल्पाकल्प, ११ महाकल्प, १२ पुंडरीक, १३ महापुंडरीक, १४ निषिध्दिका. दिगंबर परंपरेनुसार हे साहित्य मौलिक स्वरुपात उपलब्ध नसले तरी श्वेतांबर प्रणालीमध्ये आजही त्याचे अस्तित्व मानले जाते. अंगप्रविष्ट श्रुताचे १२ भेद मानले आहेत- आचार, सूत्रकृत, स्थान, समवाय, व्याख्याप्रज्ञप्ति, नाथधर्मकथा, उपासकाध्यन, अंतःकृदशा, अनुत्तरोपपातिकदशा, प्रश्नव्याकरण, विपाकसूत्र आणि दृष्टिवाद. दृष्टिवादाचे पाच अधिकार सांगितले आहेत- परिकर्म, सूत्र, प्रथमानुयोग, पूर्वगत आणि चूलिका. परिकर्माचे पाच भेद आहेत- चंद्रप्रज्ञप्ति, सूर्यप्रज्ञप्ति, जम्बूद्वीपप्रज्ञप्ति, द्वीपसागरप्रज्ञप्ति आणि पुरुषवादाचे वर्णन आहे. प्रथमानु-

योगात पुराणाचा उपदेश आहे. पूर्वगत अधिकारात उत्पाद, व्यय, ध्रौव्य यांचे विवेचन आहे. यांची संख्या १४ आहे. चूलिकेचे जलगता, स्थलगता, मायागता, रुपगता आणि आकाशगता असे ५ भेद आहेत.

दिगंबर परंपरेनुसार व्दादशांग आगमाचा उच्छेद झाला. केवळ दृष्टीवादाचा काही अंशरुपाने राहिला तो

षट्खंडागम ग्रंथाच्या स्वरुपात उपलब्ध आहे. प्रकारानुसार दिगंबर जैन आगम साहित्य प्रथमानुयोग, करणानुयोग, द्रव्यनुयोग व चरणानुयोग या चार अनुयोगात विभाजित केले आहे.

प्रथमानुयोगामध्ये पुराणे, चरित्रे, कथानके किंवा आख्यानात्मक ग्रंथ यांचा समावेश होतो. करणानुयोगात ज्योतिष व गणित या विषयावरील ग्रंथाचा अंतर्भाव होतो. चरणानुयोगात गृहस्थधर्म व मूनिधर्माचे नियम, उपनियम व आचारविषयक ग्रंथाचा समावेश होतो तर द्रव्यानुयोगामध्ये जीव, अजीव इत्यादि तत्वविचाराशी संबंधित असे दार्शनिक ग्रंथ कर्मसिध्दांत व नय-निक्षेप विषयासंबंधी सैध्दांतिक ग्रंथाचा अंतर्भाव होतो.

या सर्व धार्मिक साहित्यामध्ये द्रव्यानुयोगातील साहित्य महत्वाचे असून त्यातील ग्रंथ प्राचिन, सविस्तर आणि अत्यंत लोकप्रिय असे आहेत. अर्थातच दिगंबर परंपरेनुसार गणधर व आरातीय आचार्यरचित षट्खंडागम व कषायप्राभृत या आगम साहित्याची रचना शौरसेनी भाषेत झालेली दिसते. यापुढील भागात आपण या चार अनुयोगांची माहिती घेणार आहोत.

## चार अनुयोग

जैनागम चार भागात विभाजित अरण्यात आला आहे. या चार भागानाच अनुयोग असे म्हणतात. प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग आणि द्रव्यानुयोग हे चार अनुयोग सांगण्यात आले आहेत. या चार अनुयोगात क्रमाने कथा व पुराण, कर्म सिध्दांत व लोक विभाग, जीवाचा आचार विचार आणि चेतनाचेतन द्रव्याचे स्वरुप व तत्वांचा निर्देश करण्यात आला आहे. याशिवाय वस्तु कथन करण्याची ज्या अधिकारात आवश्यकता असते त्याला अनुयोगाव्दार असे म्हणतात. क्रियाकलापमधील समाधिभक्तीमध्ये या चार अनुयोगाना नमस्कार केलेला दिसतो. प्रथमं करणं चरणं द्रव्यं नमः । तसेच द्रव्यसंग्रह टीकेत चार अनुयोग मानण्यात आल्याचा निर्देश आहे- प्रथमानुयोगो चरणानुयोगो करणानुयोगो द्रव्यानुयोगो इत्युक्तलक्षणानुयोगचतुष्टयरुपेण चतुर्विधं श्रतुज्ञानं ज्ञातव्यम् । या चारही अनुयोगांचे प्रयोजन कोणते याविषयीची माहिती आपणाला पंडित टोडरमलजी यांच्या मोक्षमार्गप्रकाश मध्ये व्यवस्थितरीत्या मिळते.

### प्रथमानुयोगाचे प्रयोजन

प्रथमानुयोगात संसाराची विचित्रता, पाप पुण्याचे फळ, महान् पुरुषांची प्रवृत्ती इत्यादींचे विवेचन करुन, जीवाना धर्मरत करण्याचा प्रयत्न केला आहे. जे जीवबुध्दि आहेत ते देखील धर्माचे

अनुकरण करु लागतात. कारण असे जीव सूक्ष्म धार्मिक विवेचन समजू शकत नाहीत. ते लौकिक कथा जाणू शकतात व ते त्यात रस घेऊन आपल्या आचरणात बदल घडवून आणतात. शिवाय प्रथमानुयोगात कथा, पुराण, आख्यायिका यांचे विवेचन असल्यामुळे ते सहजपणे या गोष्टी जाणतात. या प्रथमानुयोगात मोठमोठ्या राजांच्या विविध कथा असतात, त्यात मनोरंजन करणाऱ्या गोष्टीचा समावेश असतो. राजाच्या पापकारक बुध्दीबरोबरच धर्माचरणाचेही त्यात वर्णन असते. सर्वसाधारण जीव लालसेने अशा कथांचे वाचन करतात व त्या वाचनातून ते पापाला वाईट कर्म व पुण्याला तथा धर्माला सुकर्म मानून त्यात त्यांना रुचि उत्पन्न होते. अशा प्रकारे सर्वसाधारण लोकाना समजण्याचा, धर्मात रुचि उत्पन्न करण्याचा प्रयत्न प्रथमानुयोगात करण्यात आला आहे. प्रथम म्हणजेच अनुत्पन्न मिथ्यादृष्टि होय, त्या विषयाचा जो अनुयोग तोच प्रथमानुयोग होय.

तसेच ज्या जीवाना तत्वज्ञानादि गोष्टी प्राप्त झाल्या आहेत अशा जीवाना प्रथमानुयोगाचे नंतर वाचन केल्यावर त्यातील ज्ञान उदाहरणरुपाने अत्यंत उपयोगी पडते. उदा - जीव अनादिनिधन आहे, शरीरादि संयोगी पदार्थ आहेत, तसेच जीवाचे भवांतर, शुभ, अशुभ, शुध्दोपयोग व त्यांचे फळ इत्यादींची माहिती पुराणातून उदाहरणादाखल तत्वाज्ञानीला मिळू शकते. याचे आणखी एक उदाहरण आपणाला पाहता येईल. उदाहरणार्थ एखाद्या महान योध्दा ज्यावेळी एखाद्या पुराणात केलेली योध्यांची प्रशंसा आणि दुर्जनाची निंदा ऐकतो त्यावेळी त्याला आपल्या योध्देपणाविषयी तथा धाडसाविषयी अधिक स्फूर्ति वाटते. त्याचप्रमाणे धर्मात्मा ज्यावेळी धर्मात्म्याची प्रशंसा व पापी लोकांची निंदा केलेल्या पुराण पुरुषांची कथा ऐकतो, वाचतो त्यावेळी तो धर्मामध्ये अधिक उत्साही बनतो. हेच प्रथमानुयोगाचे प्रयोजन जाणावे. थोडक्यात रंजित अतिरंजित कथा, आख्याने इत्यादि कथन करुन पापभष्ट्र लोकांचे मनोरंजन करणे व या मनोरंजनाव्दारेच त्यांच्यात धर्माविषयीची अनुराग उत्पन्न करणे हे प्रथमानुयोगाचे महान कार्य होय. प्रथमानुयोगः प्रथमं मिथ्यादृष्टिमविरतिकमव्युत्पन्नं वा प्रतिपाद्यमाश्रित्य प्रवृत्तोऽनुयोगोऽधिकारः प्रथमानुयोगाः ( गोम्मटसार जीवकांड )

## करणानुयोगाचे प्रयोजन

करणानुयोगात जीव कर्माचे तसेच त्रिलोकादि रचनेचे वर्णन करुन जीवाना धर्मात मग्न करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. जे जीव धर्मरत होऊ पाहतात ते जीवांचे गुण्यस्थान-मार्गणा, कर्माचे कारण-अवस्था, फल तसेच त्रिलोकातील स्वगादि ठिकाणे जाणून पापविमुक्त होऊन धर्माचरण करण्याला प्रवत्त होतात. या करणानुयोगातील ज्ञानाच्या साह्रयाने पाप-वृत्ति नष्ट पावते व तत्वज्ञानाची प्राप्ति होते. शिवाय अशा प्रकारच्या सूक्ष्म गोष्टीचे विवेचन फक्त जिनागमातच करण्यात आले आहे. त्यामुळे जिनमताचा

पगडा त्या तत्वज्ञानीच्या मनावर सहज घडू शकतो. जे तत्वज्ञानी या करणानुयोगाचा अभ्यास करतात त्यांना हा अनुयोग विशेषरुपाने भासित होतो. त्याला निश्चयरुप, व्यवहाररुप द्रव्य-क्षेत्र काल भावादीचे स्वरुप समजू शकते. करणानुयोगाच्या अभ्यासाने त्या जीवाचे तत्वज्ञान अगदी निर्मळ व स्वच्छ होते. उदाहरणार्थ एखादा हे रत्न आहे हे जाणतो, परंतु ते रत्न कोणत्या जातीचे आहे, त्याचे गुणधर्म कोणते इत्यादी त्या रत्नाचे विशेष जर जाणीत असेल तर तो रत्नपारखी समजला जाईल. त्याचप्रमाणे जो जीवादि तत्वाना जाणून आणखी त्यांच्या विशेष गुणाना जाणू शकेल, तोच खरा तत्वज्ञानी होय. तत्वज्ञान निर्मळ झाल्याने तो विशेष धर्मात्मा मानला जातो. याउलट तोच जीव इतर ठिकाणी रममाण होऊ लागला तर, त्याच्या राग व्देषादि गुणात वाढ होते. चित्ताची एकाग्रता साधता येत नाही व धर्माचरणापासून दूर होतो. हे दूरत्व नष्ट करण्यासाठी या तत्वज्ञानीला करणानुयोगात कथित केलेल्या गोष्टींचा अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. करण म्हणजेच गणित कार्याचे कारणरुप सूत्र त्या विषयीचा जो अनुयोग तोच करणानुयोग जाणावा. या करणानुयोगात गणित वर्णनाची प्रधानता असते.

## चरणानुयोगाचे प्रयोजन-

चरणानुयोगात विविध प्रकारच्या धर्माची साधने कथन करुन जीवाना धर्मरत करण्याचा प्रयत्न केला आहे. जे जीव हित-अहित, कार्य-अकार्य इत्यादि न जाणता हिंसादि पापात मग्न राहतात ते पापाचरणापासून दूर व्हावेत आणि धर्माचरणात मग्न रहावेत. म्हणून या चरणानुयोगात उपदेश देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येईल. जे धर्माचरण करु इच्छितात त्यांच्यासाठी गृहस्थधर्म व मुनिधर्म सांगण्यात आला आहे. यापैकी कोणत्याही धर्माचे पालन करुन ते आपले जीवन सद्मार्गाने व्यतीत करु शकतात. या धर्मपालनामुळे त्यांचे कषाय मंद होतात. त्यांचे फळ एवढेच की, त्यांना कमीतकमी कुगतीमध्ये दुःख प्राप्ति न होता, सुगतीची प्राप्ति होऊ शकते. यातही जो तत्परतेने राहील, धर्माचे काटेकोरपणे पालन करु शकेल तो जीव विविध ज्ञानानी युक्त होऊन सिध्दगतीला प्राप्त होऊ शकेल. तसेच जो जीव तत्वज्ञानी होऊन चरणानुयोगाचा अभ्यास करेल त्याला सर्व धर्माचरण जिनाचरणाप्रमाणे वाटू लागते व जिनावर अधिक श्रध्दा भक्ति ठेवून तो आपल्या सिध्दीप्रत वाटचाल करु लागतो. काही अंशाने अथवा पूर्णांशाने वीतरागता अथवा विरक्ती उत्पन्न झालेले जीव क्रमाने श्रावक व मुनिधर्माचे आचरण करतात. मुनिधर्माचे पालन करणारे श्रुताभ्यास करतात. अहिंसादी पाच महाव्रते, समिती, गुप्ति यांचे पालन करतात व हळूहळू हे धर्माचरण पूर्णतः दृढ झाल्यावर मरण पत्करुन सिध्दी प्राप्त करतात. श्रावक श्रावकाचाराचा धर्म पाळतात. काही अंशाने वीतरागी बनून नंतर पुण्यप्राप्ति करुन घेतात. स्त्रिया देखील आर्यिका तथा श्राविका धर्माचे पालन करुन

पुण्यप्राप्तीचा साठा करतात. थोडक्यत संपूर्ण वीतरागी होणे यालाच परमधर्म मानले आहे व हेच चरणानुयोगाचे प्रयोजन आहे.

### द्रव्यानुयोगाचे प्रयोजन-

द्रव्यानुयोगात प्रामुख्याने द्रव्य व तत्वाचे विवेचन करुन जीवाना धर्मरत करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. प्रामुख्याने सैध्दांतिक निरुपण यात केलेले असते. जे जीव जीवादी द्रव्याना जाणत नाहीत, तत्वांना मानत नाहीत, स्व-परभेद ज्यांना माहित नाही त्यांच्यासाठी हेतु दृष्टांत युक्तिव्दारे व प्रमाण नयाव्दारे त्यांचे स्वरुप समजावून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. द्रव्यानुयोगातील तत्वांच्या अभ्यासामुळे अनादि अज्ञानता नष्ट पावते. अन्य मतवाद्याची तत्वे जेव्हा खोटी भासू लागतात त्यावेळी जिनमताची प्रचिती पडू लागते. उदा-एखाद्याने एखादी विद्या आत्मसात केली परंतु त्याचा अभ्यास केला नाही तर ती विसरुन जाते. उलट अभ्यास केला तर ती कायमची आठवणीत राहते. त्याचप्रमाणे तत्वज्ञान प्राप्त झाले. परंतु त्याला योग्य व यथार्थ अशा द्रव्यानुयोगाचा अभ्यास केला नाही तर मात्र ते तत्वज्ञान विसरुन जाते. अथवा संक्षेपरुपाने जे तत्वज्ञान प्राप्त झाले होते ते विविध प्रकारच्या युक्ति, हेतु,दृष्टांत यांनी स्पष्ट होऊ शकले तर त्या ज्ञानात शिथिलता न राहता त्या ज्ञानाला गतिमानता येते. थोडक्यात द्रव्यानुयोगाच्या अभ्यासाने रागव्देषादि भाव नष्ट होतात व मोक्षप्राप्ति सुलभ होते हेच द्रव्यानुयोगाचे प्रयोजन जाणावे.

## अनुयोगातील पध्दतीची विशेषता-

प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग व द्रव्यानुयोग या चारही अनुयोगातील विषय त्यांचे प्रयोजन तथा कार्य पाहिल्यानंतर या अनुयोगात कोणती पध्दती महत्वाची असून तिची विशेषता कोणती हे पाहणे आवश्यक ठरते. या चारही अनुयोगातील पध्दतीची विशेषता आपणाला पुढीलप्रमाणे दिसून येते.

प्रथमानुयोगात अलंकार शास्त्र व काव्यशास्त्र पध्दति प्रमुख असून, वाचकाच्या मनाचे मनोरंजन करणे हा त्यातील प्रधान हेतु असतो. हे मनोरंजन अलंकारादीच्या साह्रयाने करणे सुलभ होते. शिवाय एखादी गोष्ट सहजपणे सांगण्यापेक्षा ती तिखट मीठ लावून अलंकारादिकानी विभूषित करुन सांगितली तर वाचकाच्या मनावर त्वरीत बिंबते. एखाद्या परोक्ष गोष्टीचे विस्तारपूर्वक व्यवस्थित विवेचन करुन सांगितले तर ती लवकर समजते. थोडक्यात धर्माचरणापासून दूर राहून पापचरणात मग्न असणा-या जीवांना पुन:

धर्मात स्थित करण्यासाठी प्रथमानुयोगात काव्यशैली, भाषाशैली अलंकार यांचा वापर केला जातो. हीच प्रथमानुयोग पध्दतीची विशेषता आहे. चरणानुयोगात सुभाषितयुक्त नीतिशास्त्राची पध्दती विशेष आहे. या अनुयोगात आचरण पध्दती प्रमुख असल्यामुळे यात लोकप्रवृत्यानुसार नीतिमार्ग संगितला जातो. या नीतिमार्गानेच मानवाच्या अध्यात्माची पातळी अधिक उंचावली जाते व मानव हळूहळू त्याचा स्वीकार करु लागतो. थोडक्यात मानवाच्या नीतिकत्तेची पातळी उंचावणे ही चरणानुयोग पध्दतीची विशेषता आहे. द्रव्यानुयोगात न्यायशास्त्र पध्दती प्रमुख आहे. कारण तेथे निर्णयाप्रत पोहचणे हे प्रमुख प्रयोजन असते. न्यायशास्त्रात निर्णय करण्याचा मार्ग दाखवून दिला आहे. म्हणून न्यायपध्दती हीच या अनुयोग पध्दतीची विशेषता आहे.

जैन मतानुसार बहुतेक सर्व शास्त्रे या प्रथमानुयोग. करणानुयोग, चरणानुयोग व द्रव्यानुयोग या चार अनुयोगात विभाजीत करण्यात आली आहेत. तथापि व्याकरण, छंद, कोष,वैद्यक,ज्योतिष,मंत्र इत्यादि शास्त्रे देखील जैनगमात आहेत. या शास्त्रांचे प्रयोजन कोणते यांच्या पध्दतींची विशेषता कोणती या विषयीची माहिती त्या त्या विभागानुसार देण्यात आली आहे. थोडक्यात व्याकरण, छंददींचा अभ्यास करण्याने अनुयोगरुप शास्त्रांचा अभ्यास होऊ शकतो. त्यालाच व्याकरणशास्त्र म्हणतात. या सर्व शास्त्रांचा अभ्यास सहजतेने होऊ शकला तर करावा अन्यथा त्यात सखोल विचार करण्याची जरुरी नसल्याचे शास्त्रानुसार सांगण्यात आले आहे.

जैन साहित्यातील सौंदर्य, जैन कर्मसिध्दांतातील गहनता तथा गूढता इत्यादी गोष्टी समजण्यासाठी जैन अनुयोगांचा अभ्यास करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

## द्रव्यानुयोग

प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग आणि द्रव्यानुयोग या चार अनुयोगापैकी धार्मिक साहित्यात द्रव्यानुयोगाचे महत्व सर्वात अधिक आहे. द्रव्यानुयोगातील ग्रंथ इतर ग्रंथापेक्षा प्राचीन,सविस्तर आणि लोकप्रिय आहेत. या द्रव्यानुयोगात प्रामुख्याने जीव, अजीव, तत्वांची चर्चा करणारे दार्शनिक ग्रंथ असून, त्यात कर्मसिध्दांत नय-निक्षेप इत्यादि विषयासंबंधी असलेल्या सैध्दांतिक ग्रथांचाही समावेश होतो. सैध्दांतिक ग्रंथाची चर्चा प्रस्तुत ठिकाणी करण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने आपणाला द्रव्यनुयोगाविषयी प्राकृत ग्रंथ व संस्कृत ग्रंथ असे दोन विभाग पाडता येतील. प्राकृत ग्रंथामध्ये कुंदकुंदाचे समयसार, प्रवचनसार, नियमसार, अष्टपाहुड तथा पंचास्तिकाय, नेमिचंद्रचे गोम्मटसार व पंचसंग्रह,

कर्मप्रकृती बंधस्वामित्व, जीवसमास या ग्रंथाचा समावेश करता येईल. द्रव्यानुपयोग संस्कृत रचनेत तत्वार्थसूत्र व त्यावरील टीकांचा समावेश होतो.

## द्रव्यानुयोगविषयक प्राकृत ग्रंथ-

आ. कुंदकुंदाच्या समयसार,प्रवचनसार, नियमसार, अष्टपाहुड आणि पंचास्तिकाय इत्यादि ग्रंथाचा समावेश होतो. आ. कुंदकुंद हे दिगंबर संप्रदायातील एक महान व प्रतिभाशाली आचार्य मानले जातात. कुंदकुंदाचे दुसरे नाव पद्मनंदी असून, त्यांचा काळ साधारणपणे वि.सं. पहिले शतक मानला जातो. यांना मूलसंधाचे प्रमुख मानले असून त्यांनी निर्मळ चारित्र्याचे पालन केले होते. त्यांच्या विषयीची अधिक माहिती आचार्य खंडात देण्यात आली आहे.

## समयसार-

कुंदकुंद विरचीत हा एक महत्वाचा अध्यात्मिक ग्रंथ मानला जातो. प्रस्तुत ग्रंथामध्ये शुध्द निश्चयनयाच्या प्रधानतेने शुध्द आत्मतत्वाचा विचार करण्यात आला आहे. यात एकूण ६ अधिकार आहेत. जीवाजीवाधिकार, कर्तृ-कर्मधिकार, पुण्य-पापाधिकार, आस्त्रव, संवर,निर्जरा, बंध, मोक्ष आणि सर्व विशुध्द ज्ञान. या ग्रंथातील सर्व गाथांची संख्या ४४५ इतकी आहे. दृष्टांत, उदाहरण, उपमांच्या साह्रयाने आत्म्याच्या स्वाभाविक व विभाविक परिणतीचे सुंदर विवेचन केले आहे. या ग्रंथावर अमृतचंद्र विरचित आत्मख्याति व जयसेनरचित तात्पर्य तात्पर्यवृत्ति टीका आहे.

## प्रवचनसार-

या ग्रंथात एकूण २७५ इतक्या गाथा असून हा ग्रंथ देखील अध्यात्मिकदृष्ट्या महत्वाचा आहे. या ग्रंथाचे विभाजन ज्ञान, ज्ञेय व चारित्र या श्रुतस्कंधात केले आहे. या ठिकाणी आचार्यानी ज्ञान या आत्म्याच्या मूळगुणाच्या स्वरुपाचे सूक्ष्मरीत्या विवेचन केले आहे. जीवाच्या शुभप्रवृत्ति पुण्यकारक, अशुभप्रवृत्ति पापकारक तर शुध्दप्रवृत्ति कर्ममुक्तिकारक सांगितल्या आहेत. ज्ञेयतत्व प्रकरणात गुण व पर्याय

यातील भेद व व्यावहारिक जीवनातील आत्मा व पुद्गल यांच्या परस्पर संबंधाचे वर्णन केले आहे. चारित्राधिकारात श्रमणदिक्षा व साधनेचे स्वरुप सांगितले आहे. समयसाराचे स्वरुप पुढीलप्रमाणे विशद केले आहे- कम्मं बध्दमबध्दंजीवं एवं तु जाण णयपक्खं । पक्खादिक्कंतो पुण भप्पदि जो सो समयसारो ।।

## पंचास्तिकाय -

प्रस्तुतचा ग्रंथ दोन श्रुतस्कंधात विभक्त करण्यात आला आहे. जीव,पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काल ही सहा द्रव्ये आहेत. जे गुण व पर्यायानी युक्त आहे त्याला द्रव्य असे म्हणतात. मूर्तामूर्त द्रव्यांचे जे अविभाजित भाग आहेत त्यांना प्रदेश म्हणतात. जे द्रव्य अशा प्रदेश समूहांनी युक्त आहे त्याला अस्तिकाय म्हटले आहे. अस्तिकाय ५ आहेत - जीव,पुद्गल,धर्म अधर्म व आकाश, गुण पर्यायांनी युक्त काल देखील एक द्रव्य आहे, परंतु प्रदेशव्यापी नसल्यामुळे त्याला द्रव्याचे स्थान दिले नाही. अशा प्रकारे पाच अस्तिकाय आणि सहावे काल अशा सहा द्रव्यांची माहिती प्रथम श्रुतस्कंधात दिली आहे. या ग्रंथाच्या शेवटी या द्रव्यांना जाणून जो राग-व्देष, मोह व बंध रहित होतो त्याची दु:खापासून मुक्ति होते.

दुस-या श्रुतस्कंधात मोक्षमार्ग विषयक असलेल्या जीव,अजीव, पुण्य,पाप,आवस्त्र,संवर,निर्जरा, बंध व मोक्ष या ९ पदार्थाचे विवेचन आहे. त्यानंतर मोक्षमार्ग स्वरुप ज्ञान, दर्शन आणि चरित्र स्वरुपाविषयी माहिती सांगून परसमय व स्वसमयाचा विचार केला आहे. संसारी जीव स्वभावनियत ज्ञान-दर्शन यांनी युक्त असूनसुध्दा अनादि मोहनीय कर्माच्या उदयामुळे तो विभाव गुण -पर्यायानी परिणत होऊन परसमयी आहे. जेव्हा तो शुध्दोपयोगी होतो तेव्हा बंधरहित होतो. अशाप्रकारे या ठिकाणी निश्चय-व्यवहार स्वरुप मोक्षमार्गाचा विचार करण्यात आला आहे. शेवटी ग्रंथकाराने म्हटले आहे की, मी प्रवचनभक्तीपासून प्रेरित होऊन मार्गप्रभावनेसाठी प्रवचनसारभूत पंचास्तिकायसंग्रह सूत्राची रचना केली आहे. यावर अमृतचंद्रविरचित तत्वदीपिका व जयसेनचार्यविरचीत तात्पर्यवृत्ति नावाची टीका आहे.

## आ. नेमिचंद्राचे ग्रंथ-

आ. नेमिचंद्र हे सिध्दांत साहित्यातील एक प्रकांड पंडित मानले जातात. त्यांचा काळ सुमारे ११ वे शतक मानला जातो. ते चामुंडरायाचे समकालीन होते. चामुंडराय राजा रायमल्लाच्या

दरबारी मंत्री व सेनापती होता. त्यांचे दुसरे नाव गोम्मटराय होते. त्याच्या प्रश्नांची उत्तरे म्हणूनच आ. नेमिचंद्रानी गोम्मटसार या ग्रंथाची रचना केली. या ग्रंथाची रचना षट्खंडागम नावाच्या सिध्दांत ग्रंथाच्या आधारे करण्यात आली आहे.

## गोम्मटसार-

या ग्रंथातील सर्व गाथांची संख्या १७०५ इतकी आहे. हा ग्रंथ जीवकांड व कर्मकांड या दोन भागात विभागला गेला आहे. जीवकांडामध्ये ७३३ इतक्या गाथा असून, त्यात गुणस्थान,जीवसमास, पर्याप्ति, प्राण, संज्ञा १४ मार्गणा आणि २० प्ररुपणांचे वर्णन आहे. जीव अनंत असून बादर सूक्ष्मादि अनेक भेद आहेत या भेदानाच जीवसमास असे म्हणतात. त्यांचे एकूण १४ भेद असून ४७ गाथा( ७०-११६) मध्ये यांचे विवेचन करण्यात आले आहे. आहार शरीरादीच्या दृष्टीने पर्याप्ति सहा प्रकारच्या आहेत. त्यांचे वर्णन ११ (११७-२७ ) गाथांच्या व्दारे केले आहे. पाच इंद्रिय,मनबलादि तीन बल, श्वासोच्छ्वास आणि आयु हे १० प्राण सांगितले आहेत.यांचे वर्णन ५ (१२८-३२) गाथांमध्ये आहे. आहार, भय,मैथुन आणि परिग्रह या चार संज्ञा आहेत. यांचे वर्णन ६ गाथांमध्ये (१३३-३८) मध्ये आहे. गति,इंद्रिय,काय,योग,वेद,कषाय,ज्ञान,संयम,दर्शन,लेश्या,भव्यत्व,सम्यक्त्व,संज्ञी व आहार या चौदा मार्गणा सांगण्यात आल्या आहेत. त्यानंतर १६ अंतराधिकाराच्या साह्याने लेश्या मार्गणाचे विवेचन केले आहे.

कर्मकांडामध्ये एकूण ९७२ इतक्या गाथा आहेत. यात एकूण ९ अधिकार आहेत-प्रकृतिसमुत्कीर्तन, बंध-उदय-सत्व, सत्वस्थान, त्रिचुलिका, बंध-उदय सत्वस्थानसमुत्कीर्तन,प्रत्ययरुपणा, भावचूलिका,त्रिकरणचूलिका आणि कर्मस्थितिरचना इत्यादी. या विविध ९ अधिकरांच्याव्दारे कर्मकांडाची विस्तृत माहिती दिली आहे. बध्द कर्म कुठपर्यत उदयाला येत नाही आणि पुनः आपापल्या स्थितीनुसार ते कसे जीर्ण होते, याविषयीचे विवेचन अंतिम अधिकारात आहे. ग्रंथाच्या अंतिम प्रशस्तीमध्ये नेमिचंद्रानी गोम्मटरायाची प्रशंसा केली आहे. या ग्रंथावर अभयचंद्राचार्य (वि.सं. १४वे शतक) रचित मंदप्रबोधिका नावाची संस्कृत टीका असून, दुसरी नेमिचंद्राचार्य विरचित जीवतत्वप्रदीपिका ही देखील संस्कृत टीका आहे. या दोन टीकाशिवाय सम्यग्ज्ञानचंद्रिका ही हिंदी टीका आहे.

## लब्धिसार व क्षपणार-

या दोन्ही ग्रंथाची रचना आ. नेमिचंद्रानी केली आहे. या ग्रंथात कर्मापासून विमुक्त होण्याचा उपाय सविस्तरपणे वर्णिला आहे. लब्धिसारांतर्गत क्षपणसाराचा समावेश होतो. राजा चामुंडरायासाठी या ग्रंथाची रचना करण्यात आली. कषायप्राभृत नावाच्या जयधवल सिध्दांताच्या १५ अधिकारातून १५ व्या पश्चिमस्कंध नावाच्या अधिकाराव्दारे यांची रचना करण्यात आली आहे. कर्मात मोहनीय कर्म अधिक बलवान असून त्याला मिथ्यात्व कर्म देखील म्हणतात. लब्धिसारामध्ये या कर्मातून मुक्त होण्यासाठी ५ लब्धींचे वर्णन केले आहे. यात करणलब्धि मुख्य असून त्यामुळे मिथ्यात्व कर्माची नष्टता होते व सम्यकत्वाची प्राप्ति होते. लब्धिसारामध्ये दर्शनलब्धि, चारित्रलब्धि आणि क्षायिकचारित्र नावाचे तीन अधिकार आहेत. उपशमचरित्र अधिकारापर्यत केशववर्णीनी टीका लिहिली असून हिच्या आधारे पंडित टोडरमलजींनी भाषा टीकेची रचना केली आहे. क्षपणाधिकार गाथांची टीका माधवचंद्र त्रैविद्य यांनी संस्कृत गद्यात केली असून, यालाच लब्धिसार क्षपणसार म्हटले जाते.

**द्रव्यसंग्रह-**

द्रव्यसंग्रह ही देखील आ. नेमिचंद्र सिध्दांत चक्रवर्ती यांची रचना असून त्यात एकूण ५८ गाथा आहेत. या गाथांच्याव्दारे जीव, अजीव, धर्म, अधर्म आकाश, काल तथा कर्म, तत्व, ध्यान यांचे विवेचन केले आहे. यावर ब्रह्मदेवाची संस्कृतमधील बृहतटीका आहे. पंडीत द्यानतराय यांनी द्रव्यसंग्रहाचा छंदोनुबध्द हिंदी अनुवाद केला आहे.

**पंचसंग्रह**

षट्खंडागम परंपरेतील ‘पंचसंग्रह’ हा एक महत्वाचा ग्रंथ मानला जातो. या ग्रंथात जीवसमास, प्रकृतिसमुत्कीर्तन, कर्मस्तव व सप्ततिका अशी पाच प्रकरणे असून, त्यात अनुक्रमे २०६, १२, ७७, १०५, ७० इतक्या गाथा आहेत. दृष्टीवाद ग्रंथातील काही गाथांचा कथनामध्ये उपयोग केल्याचे स्वतः ग्रंथकाराने स्पष्ट केले आहे. शतक प्रकरणाच्या शेवटी १०३ गाथेव्दारे कर्मप्रवादीविषयी

सांगून बंधसमासाचे वर्णन केले आहे. किंबहुना मी दृष्टीवादाचा सार सांगणार आहे असेही म्हटले आहे. बहुधा या पाच प्रकरणांची रचना स्वतंत्रपणे करण्यात आली असावी. यावर एक संस्कृत टीका आहे. टीकाकर्त्याच्या परिचयावरुन या टीकेची रचना प्रभाचंद्राने केली असावी. या पंचसंग्रहाच्या आधारेच अमितगतीने संस्कृत श्लोक बध्द पंचसंग्रहाची रचना केली असावी.

**कर्मप्रकृति (कम्मपयडि)**

या ग्रंथाची रचना शिवकर्म यांनी केली असून यात एकूण ४१५ इतक्या गाथा आहेत. एकूण बंधन, संक्रमण, उव्दर्तन, अपवर्तन, उदीरणा, उपशमना, उदय व सत्ता अशा आठ प्रक रणाव्दारे या ग्रंथाचे विभाजन करण्यात आले आहे. या ग्रंथावर एक चूर्णि आणि मलयगिरी व यशोविजय यांच्या दोन टीका उपलब्ध आहेत. ‘सत्थग’ (शतक) या दुस-या ग्रथाचीही त्यांनी रचना केली आहे. यावरही यशोविजय यांची रचना टीका आहे.

**प्राकृत पंचसंग्रह-**

या ग्रंथाची रचना पार्श्वर्षीशिष्य चंदर्षी यांनी केले आहे. हा ग्रंथ श्वेतांबरी संप्रदायाचा मानला जातो. या ग्रंथाचा रचनाकाला साधारणपणे ६ वे शतक मानला जातो. या ग्रंथाची विभागणी पंचव्दारामध्ये करण्यात आली आहेत- शतक,सप्तमी, कषायप्राभृत, षट्कर्म आणि कर्मप्रकृति ही पाच व्दारे आहेत. एकूण गाथासंख्या ९६३ इतकी आहे. यावर मलयगिरीची टीका आहे.

**जीवसमास-**

या ग्रंथाची रचना पूर्वधरांनी केली आहे. ज्योतिषकरंडकप्रमाणेच जैन आगमाच्या वल्लभी वाचनेचे अनुकरण करुन या ग्रंथाची रचना केली आहे. यात एकूण २८६ गाथा असून, त्यात सत्, प्रमाण, क्षेत्र, स्पर्श, काल, अंतर भाव यांच्या अपेक्षेने जीव अजीवाचा विचार करण्यात आला आहे. या ग्रंथावर मलधारी हेमचंद्रानी ११०७ मध्ये ७००० श्लोकांनी युक्त बहद् वृत्ती लिहीली आहे. शीलांक आचार्यांनी देखील या ग्रंथावर वृत्ती लिहली आहे.

**कसायपाहुड-**

द्रव्यानुयोगातील ग्रंथामध्ये कषायपाहुडाचे महत्व अत्याधिक आहे. या ग्रंथाची रचना आ. गणधर यांनी केली. कसायपाहुडाची रचना षट्खंडागमाप्रमाणे सूत्ररुप नसून काव्यबध्द आहे. यात २३३ मूलगाथा आहेत. या गाथामधून कषाय (क्रोध), मान, माया व लोभ यांच्या स्वरुपाचे विवेचन व कर्मबंधामध्ये त्याची कारणरुव प्रक्रीया यासंबंधी विवेचन केले आहे. या चार कषायांचे राग व्देषरुप दोन वर्ग पडतात. म्हणून या ग्रंथाचे दुसरे नाव ‘पेज्ज दोसपाहुड’ असे आहे. आचार्य यतिवषभाने या ग्रंथाव्दारे ६००० श्लोकप्रमाण वृत्तिसूत्राची रचना

केली. त्यानंतर वीरसेनांनी व आचार्य जिनसेनांनी ६०,००० श्लोकप्रमाण टीका लिहिली. या टिकेत प्राकृत व क्वचित प्रसंगी संस्कृतचाही वापर केला आहे.

या वरील ग्रंथाशिवाय गार्गर्षिकृत कर्मविपाक (कम्मविवाग), जिनवल्लभगणिकृत षडीशीती (सडसीइ) या कर्मविषयक ग्रंथाची रचना करण्यात आली. याशिवाय कर्मस्तव, बंधस्वामित्व, सप्ततिका अशा तीन कर्मबंध विषयक प्राकृत ग्रंथांची रचना एका अज्ञात ग्रंथकाराकडून करण्यात आली आहे. या सर्व कृति अतिप्राचीन मानल्या जात असून, त्यावर चूर्णि, वृत्ति, भाष्य, टिप्पण, टिकादी लिहिल्या गेल्या आहेत. जिनभद्रगणींनी विशेषणवती हा ४०० गाथांनी युक्त ग्रंथ लिहिला असून, त्यात ज्ञान, दर्शन, जीव, अजीव अशा विविध गोष्टींची चर्चा केली आहे. इ.स. १३ व्या शतकात देवेंद्रसूरीने कर्मविपाक,कर्मस्तव,बंधस्वामित्व,षडशीती व शतक या ग्रंथाची रचना केली असून त्यांना 'नवे कर्मग्रंथ' असे म्हणतात. १८ शतकात यशोविजय उपाध्याय यांनी भाषारहस्यप्रकरण या ग्रंथाची रचना केली त्यात एकूण १०१ इतक्या गाथा आहेत. त्यात द्रव्यभाषा व भावभाषा यांचे विवेचन करुन १० सत्यांचे विवेचन केले आहे. वरील सर्व द्रव्यानुयोगाच्या दृष्टीने महत्वाचे मानले जातात.

**संस्कृत ग्रंथ**

द्रव्यानुयोगातील प्राकृत साहित्याप्रमाणेच संस्कृत साहित्य देखील द्रव्य,जीव,तत्व तथा कर्मसिध्दांताविषयी महत्वाचे आहे. द्रव्यानुयोगातील संस्कृत ग्रंथामध्ये प्रामुख्याने उमास्वातिकृत तत्वार्थसूत्र व त्यावरील टीका यांचा समावेश होता. त्याविषयीची चर्चा खालीलप्रमाणे आहे.

तत्वार्थसूत्र ग्रंथाची रचना आचार्य उमास्वातींनी केली असून दिगंबर आणि श्वेतांबर या दोन्ही संप्रदायाची याला मान्यता आहे. हा ग्रंथ जैन परंपरेनुसार सर्वश्रेष्ठ मानला जातो. या ग्रंथाला मोक्षशास्त्र या नावाने देखील संबोधिले आहे. श्वेतांबर परंपरेनुसार या ग्रंथाला तत्वार्थधिगम सूत्र म्हटले आहे. आचार्य उमास्वातींचा काळ साधारणपणे दुसरे-तिसरे शतक मानला जातो. आ. उमास्वातींनीच सर्वात प्रथम संस्कृत सूत्ररचनेला सुरुवात करून इतर जैन धर्मिकांना एक आदर्श घालून दिला. कमी शब्दात जास्त अर्थ सामावून सर्व जैन दर्शनविषयक एकत्रित अभ्यास करण्यासाठी या ग्रंथाची रचना केली असावी. या ग्रंथाला ख्रिस्तांच्या बायबलाएवढे तथा मुस्लिमांच्या कुराणाएवढेच महत्व दिले जाते.

तत्वार्थसूत्रात एकूण १० अध्याय असून सूत्रसंख्या ३५७ इतकी आहे. श्वेतांबर परंपरेनुसार ती ३४४ इतकी मानली जाते. या ग्रंथातील 'सम्यग्दर्शन-ज्ञान-चरित्राणि मोक्षमार्गः' हे सर्वात प्रमुख व प्रथम सूत्र असून सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान आणि सम्यक्चारित्ररुप परिणत आत्मा हाच मोक्षमार्ग होय. मोक्षमार्गाचेच दुसरे नाव आत्मधर्म हे आहे. थोडक्यात वरील रत्नत्रयांनी युक्त आत्मा हाच मोक्षमार्गचा अधिकारी होऊ शकतो अन्यथा

नाही. त्यानंतर 'तत्वार्थश्रध्दानं सम्यग्दर्शनम्' असे म्हणून जीव, अजीव, आस्त्रव, बंध, संवर, निर्जरा, मोक्ष ही सात तत्वे सांगितली आहेत. पुण्य व पाप आस्त्रव आणि बंध यांचे विशेष असल्यामुळे त्यांना वेगळे स्थान दिले नाही. थोडक्यात प्रथम अध्याय भूमिकारुपाने घेण्यात आला आहे.

दुस-या, तिस-या व चौथ्या अध्यायात प्रामुख्याने जीवतत्वाचे विवेचन करण्यात आले आहे. प्रसंगानुरुप या तिन्ही अध्यायात पाच भाव, जीवाचे लक्षण, मनाचा विषय, पाच इंद्रिय, त्याचे इतर भेद व विषय, पाच शरीर, तीन वेद, नरकलोक, मध्यलोक, ऊर्ध्वलोक (तीन लोक), चारी गतीमधील जीवांचे आयुष्य इत्यादींचे विस्ताराने विवेचन केले आहे. पाचव्या अध्यायात अजीव तत्वाचे विवेचन करण्यात आले आहे. यात सहा द्रव्य गुणपर्याय यांचे सांगोपांग वर्णन केले आहे. सहाव्या व सातव्या अध्यायामध्ये आस्त्रव तत्वाचे विवेचन केले आहे.

प्रसंगी पाप-पुण्याचे देखील वर्णन केले आहे. संसारी जीवांच्या बाबतीत शुभ आणि अशुभ भाव सांगितले आहेत. देव-गुरु-शास्त्रभक्ति व्रतपालन इत्यादि शुभभाव असून, पंचेद्रियादि विषयात लोलुपता व हिंसादि कार्य करणे अशुभ भाव आहेत. आठव्या अध्यायात प्रकृतिबंध इत्यादि चार प्रकारच्या कर्मबंधाचा आणि हेतूंचा निर्देश केला आहे. कषाय आणि योग ही मुख्य असून योगामुळे प्रकृतिबंध व प्रदेशबंध होतो तर कषायामुळे स्थितिबंध व अनुभागबंध होतो. अध्याय नऊमध्ये संवर आणि निर्जरा तत्वांच्या करणांचे सांगोपांग विवेचन करण्यात आले आहे. शुभाशुभ भावाचे नांव आस्त्रव असून त्या भावांचा निरोध करणे संवर आहे. दहाव्या अध्यायात पूर्णतः मोक्षाचे वर्णन केले आहे.

प्रस्तुत ग्रंथ आकाराने लहान पण अर्थाने महान असा आहे. जैनधर्मातील हा एक अत्यंत पवित्र असा ग्रंथ मानला जातो. थोडक्यात या ग्रंथाबाबत 'गागर मे सागर' चा अनुभव प्रत्ययास येतो.

**तत्वार्थसूत्रावरील टीका-**

तत्वार्थसूत्रावर प्राचीन, अर्वाचीन, लहान-मोठ्या अशा अनेक संस्कृत तथा लौकिक भाषेतील टीका उपलब्ध आहेत. परंतु त्यातील ज्या ऐतिहासिक, जैन तत्वज्ञानाने परिपूर्ण तसेच दार्शनिकदृष्ट्या महत्वाच्या आहेत अशा पाच टीकाच उपलब्ध आहेत. दिगंबर-श्वेतांबर या दोन्ही संप्रदायाच्या दृष्टीने तत्वार्थसूत्राचे अत्याधिक महत्व असल्यामुळे दोघांनीही या ग्रंथावर टीका लिहिल्या आहेत. तत्वार्थसूत्रावरील पुढील महत्वाच्या पाच टीका मानल्या जातात- १. सर्वार्थसिध्दि २. तत्वार्थवार्तिक ३. तत्वार्थश्लोकवार्तिक ४. सुखबोधा ५. तत्वार्थवृत्ति. या टिकांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे आहे-

## १. सर्वार्थसिध्दि-

तत्वार्थसूत्रावरील सर्वार्थसिध्दी ही सर्वात प्राचीन टीका मानली जाते. यावर आचार्य समंतभद्रांनी गंधहस्तिमाभाष्य नावाची टीका लिहीली असल्याची ख्याती आहे. परंतु ती अद्याप उपलब्ध नाही. म्हणून सर्वार्थसिध्दि ही देवनंदी पूज्यपाद (५वे शतक) यांची प्रथम टीका मानली जाते. लक्षणांच्या दृष्टीने या टीकेचे महत्व मोठे आहे. या टीकेत जी लक्षणे देण्यात आली आहेत. त्यांनी विव्दानांना प्रभावित केले आहे. म्हणूनच या ग्रंथाला 'लक्षण ग्रंथ' असे मानतात. यात तत्वार्थसूत्रातील सूत्रांच्या प्रत्येक पदाचा विशेष अर्थ प्रांजळपणे दिला आहे. नंतरच्या सर्व टिकाकारांनीं याच टिकेला आदर्शभूत मानले आहे. आवश्यक टिकाणी व्याकरणाधारे अनेकानेक पदांची सिध्दि करुन प्रकृति व प्रत्यय यांचा निर्देश केला आहे. यातील 'तत्वार्थश्रध्दानं सम्यग्दर्शनम्' सूत्रांच्या टीकेत सम्यग्दर्शनाचे सरागसम्यग्दर्शन व वीतरागसम्यग्दर्शन असे दोन भेद केले आहेत. प्रशम, संवेग, अनुकंपा आणि आस्तिक्य या चिन्हावरुन जयाची अभिव्यक्ती होते त्याला सरागसमयग्दर्शन व आत्म्याच्या विशुध्दावस्थेला वीतरागरम्यदर्शन असे म्हटले आहे. 'जीवजीवास्त्रसंवरनिर्जरामाक्षास्तत्वम्' या सूत्राच्या टीकेत पुण्य आणि पापचा अंतर्भाव आस्त्रव व बंधात होतो. म्हणून सूत्रकाराने त्यांची वेगळी चर्चा केली नाही. तद्भावाव्ययं नित्यम् च्या टीकेत वस्तू स्वभावाने नित्य असून परिणामी असल्याचे म्हटले आहे. जर वस्तूंची सर्वथा नित्यता मानली तर, तिच्यात घडू शकणार नाही व मग संसार आणि निवृत्ति यांच्या प्रक्रियेत गोंधळ होईल. अशा प्रकारे या टीकेला

भट्टाकलंकदेवाने तत्वार्थ्ववार्तिकामध्ये वार्तिकाच्या स्वरुपात मानजे आहे. यावरुनच सर्वार्थसिध्दि टीकेचे महत्व आपणाला पटते. सर्वार्थसिध्दीमुळे तत्वार्थवार्तिकात आणि तत्वार्थवार्तिकामुळे तत्वार्थश्लोकवार्तिकाची विशषता उत्तरेत्तर वाढत गेल्याचे दिसते. या सर्वांचे श्रेय सर्वार्थसिध्दीलाच आहे. थोड्या शब्दात अधिक अर्थ सामावण्याची एक सुंदर पध्दती या ग्रंथात वापरली आहे. तत्वार्थसूत्रावरील नंतरच्या सर्व टीकेतून या टीकेचा प्रभाव आढळतो. एवढेच नव्हे तर, पूज्यपादांच्या इष्टोपदेश, समाधिशतक आणि जैनेंद्र व्याकरण या ग्रंथातही या टीकेचा काही अंशाने प्रभाव आढळतो.

## २. तत्वार्थवार्तिक-

या टीकेची रचना आचार्य भट्टाकलकदेवाने केली असून २७ सूत्र सोडून बाकी सर्व वार्तिक रचना गद्यरुपात केली आहे. यांची एकूण संख्या २६७० इतकी आहे. सातव्या शतकात सूत्रावर वार्तिक रचना करणे श्रेष्ठ मानले होते. वार्तिकाच्या रचनेत काही ठिकाणी क्लिष्टता दिसून येते. तत्वार्थवार्तिक याचेच दुसरे नाव तत्वाथराजवार्तिक असे आहे. या टीकेची विशेषता अशी की, अन्य दार्शनिकांच्या शंकेचे समाधान आगम व मुक्तीच्या साह्याने देऊन शेवटी अनेकांताचा आधार घेतला आहे. सप्तभंगीचे स्वीकारलेले लक्षण, स्व-आत्मा परमात्मा विश्लेषण, आठ कालादींच्याव्दारे अभेदोपचाराची चर्चा, अनेकांतात सप्तभंगीची योजना, अनेकांतात दिलेल्या दूषणांचे निरसन आणि लक्षणाचे आत्मभूत व अनात्मभूत हे दोन इत्यादी या भाष्याची विशेषता आहे. या भाष्यात सैध्दांतिक, दार्शनिक आणि भौगोलिक विषयांची चर्चा प्रसंगानुरुप दृष्टीस पडते.

**३. तत्वार्थश्लोकवार्तिक-**

तत्वार्थश्लोकवार्तिकाची रचना ९ व्या शतकातील आचार्य विद्यानंदी यांनी केली असून त्यांचे आप्तपरीक्षा, पत्रपरीक्षा, प्रमाणपरीक्षा, सत्यशासनपरीक्षा आणि अष्टसहस्त्री इत्यादी ग्रंथ प्रसिध्द आहेत. तत्वार्थश्लोकवार्तिकालाच श्लोकवार्तिक नावानेही संबोधिले आहे. तत्वार्थसूत्रातील प्रथम ३५ सूत्र सोडून इतर सर्वावर वार्तिक लिहिले आहे. यांचे संख्या २७०१ इतकी आहे. कुमारिलभट्टच्या मीमांसाश्लोकवार्तिक व धर्मकीर्तीच्या प्रमाणवार्तिक शैलीचे अनुकरण केल्याचे दिसते. या टिकेत उपेंद्रवज्रा, स्वागता, शालिनी, मालिनी, शिखरीणी व शार्दुलविक्रीडीत या छंदाचा वापर केला आहे. वार्तिकावर वृत्ति लिहीली असून तिला महाभाष्याची संज्ञा दिली जाते. तत्वार्थसूत्रावरील ही एक प्रामाणिक टीका मानली जाते. या टीकेत दार्शनिक मतांची चर्चा असून वैशेषिक, नैयायिक, मीमांसक इत्यादी दार्शनिकांच्या सिध्दांताची चर्चा करण्यात आली आहे. भावना, विधी, नियोग, निग्रहस्थान इत्यादींची आलोचना व जयपराजयाचे वर्णन केले आहे. नयांचे केलेले विस्तृत वर्णन अधिक महत्वाचे आहे. या टीकेची भाषाशैली सरळ व ओघवती असून विषय गांभीर्यामुळे काही ठिकाणी क्लिष्टता आली आहे.

**४. सुखबोधा-**

ही टीका सर्वार्थसिध्दीपेक्षा लहान आहे. या टीकेत मोक्षमार्गस्य नेतारं भेतारं कर्मभूभृताम् इत्यादी मंगल पद्याची देखील टीका केली आहे. सत्संख्यादी सूत्रांची टीका संक्षिप्त लिहिली आहे. विषयाला पुष्ट

करण्यासाठी या टीकेतील पाचव्या अध्यायात दार्शनिक चर्चा विस्तृतपणे करण्यात आली आहे. या टीकेचे कर्ते भास्करनंदी असून, त्यांचा काल साधारणपणे १३ वे शतक मानला जातो.

**५. तत्वार्थवृत्ति-**

तत्वार्थसूत्रावर १६ व्या शतकात श्रुतसागर यांनी तत्वार्थवृत्ति नावाची टीका लिहीली.या टीकेत 'श्रुतसागरवृत्ति' या नावानेही संबोधिले जाते. या टीकेत देखील मंगलाचरणावर टीका लिहिण्यात आली आहे. या टीकेत काही काही ठिकाणी सर्वार्थसिध्दीचे व काही ठिकाणी राजवार्तिकाचे अनुकरण करण्यात आले आहे.

अशा प्रकारे तत्वार्थसूत्रावर प्रकाशित, अप्रकाशित संस्कृत, हिंदी, मराठी, गुजराथी भाषेतून अनेक टीका लिहिल्या गेल्या आहेत. तत्वार्थसूत्रावर लिहिलेल्या टीका टीप्पणींची माहिती तसेच संख्या शोधावयास सुरुवात केली तर, ती शंभराहून अधिक भरेल. या विविध टीकावरुनच मूळ उमास्वाति रचित तत्वार्थसूत्राचे महत्व सहजपणे आपल्या लक्षात येते.

तत्वार्थसूत्र व त्यावरील टीकेशिवाय आचार्य अमितगतिचित 'पंचसंग्रह' हा ग्रंथ देखील द्रव्यानुयोगातील एक महत्वाचा ग्रंथ मानावा लागतो.या ग्रंथाची रचना व्दितीय अमितगति यांनी वि.स. १०७३ मध्ये केली असून त्यात एकूण ५ परिच्छेद आहेत. यात बंधक, बध्यमान, बंधस्वामी, बंधकारण व बंधभेद ही ५ प्रकरणे आहेत. याची अनुक्रमे पद्यसंख्या ३५३,४८,१०६,७७६,९०, मिळून १४५५ इतकी आहे. मधूनमधून गद्यात्मक रचना दृष्टीस पडते.

प्रथम प्रकरणात गुणस्थान, जीवसमास, पर्याप्ति, प्राणसंज्ञा, मार्गणाव्दारे कर्मबंधी जीवाचे विवेचन केले आहे. बंधमान दुस-या प्रकरणात बंधाला प्राप्त करणा-या ज्ञानावरणादी कर्मप्रकृतींचे विवेचन आहे. तिस-या प्रकरणात बंधस्वामीचे वर्णन करुन बंध उदय व सत्व यांच्या उच्छेदाविषयी माहिती दिली आहे. चौथ्या प्रकरणात बंधकारणात विचार करुन प्रथम चौदा जीव समासातील एकेंद्रियादि जीवाना कसा बंध होतो याचा विचार करुन पुढे हेच विवेचन मार्गणाव्दारे करण्यात आले आहे. त्यानंतर मार्गणा जीवसमास इत्यादीमध्ये किती गुणस्थान, उपयोग, योग व प्रत्यय संभवू शकतात याचा विचार केला आहे. शेवटी मार्गणांच्या आश्रयाने बंधस्थान, उदयस्थान आणि सत्वस्थान यांची चर्चा करुन गुणस्थान व मार्गणास्थान कोणते, जीव किती व कोणकोणत्या प्रकृतिबंधानी युक्त होतात. याचे विवेचन केले आहे. ग्रंथाच्या शेवटी महावीरांना नमस्कार केला आहे. या ग्रंथाचे प्रकाशन जैन ग्रंथमाला समिति, मुंबईव्दारे झाले आहे.

**करणानुयोग साहित्य**

द्रव्यानुयोगानंतर करणानुयोग हा जैन साहित्याचा दुसरा भाग मानण्यात येतो. या विभागामध्ये सर्वसाधारणपणे सूर्यप्रज्ञप्ति, चंद्रप्रज्ञप्ति, जंबूव्दीपप्रज्ञप्ति, व्दीपसागरप्रज्ञप्ति या प्रज्ञप्ति ग्रंथाखेरीज लोकविभाग, तिलोयपण्णती, त्रिलोकसार, क्षेत्रसार व संग्रहणी, बृहत क्षेत्रसमास ज्योतिषकरंडक या ग्रंथाचा समावेश होतो. प्रज्ञप्ति ग्रंथाचा उल्लेख द्रव्यानुयोगात देखीील आलेला दिसून येतो. या सर्व ग्रंथातून साधारणपणे लोक म्हणजेच ऊर्ध्व, मध्य व अधोलोक यांचे वर्णन, व्दिप, सागर, क्षेत्र, वर्ण, पर्वत, नद्या, वनप्रदेश इत्यादींचे वर्णन करण्यात आले आहे.

प्रज्ञप्ति ग्रंथामधून विश्वाचे प्रामुख्याने लोकाकाश व अलोकाकाश असे दोन भाग करण्यात आले आहेत. अलोकाकाशामध्ये आकाशाशिवाय दुसरे कोणतेही चेतन अथवा अचेतन असे द्रव्य नाही. मात्र लोकाकाशामध्ये जीव, पुद्‌गल इत्यादी असून त्यांच्या गमनागमनास साहाय्यभूत ठरणारी धर्म, अधर्म व परिवर्तनभूत असणारी पाच द्रव्ये आहेत. द्रव्याने युक्त असणा-या लोकाचे ऊर्ध्व, मध्य व अधो असे तीन प्रमुख भाग करण्यात आले आहेत.

मध्यलोकामध्येच आपण निवास करीत असलेली पृथ्वी आहे. या पृथ्वीचा आकार गोलाकार आहे.

विविध व्दीपांच्या व सागरांच्यामुळे तिचे अनेक भाग पडतात. या सर्वाच्या मध्यभागात एक योजन प्रमाणाचे जंबूव्दीप आहे. या जंबूव्दीपाला वेढणारा दोन लक्ष योजन विस्ताराचा वलयांकित असा लवण समुद्र आहे. लवण समुद्राला वेढणारा घातकीखंडव्दीप असून या व्दीपाचा विस्तार चार लक्ष योजन इतका आहे. त्याला वेढणारा आठलक्ष योजन विस्ताराचा कालोदधि नावाचा समुद्र आहे. त्यापुढे सोळा लक्ष योजनांचे पुष्करवरव्दीप आहे. अशाच प्रकारे एकमेकांना वेढणारे व दुप्पट विस्तार असणारे असंख्य सागर आणि व्दीप आहेत. पुष्करवर व्दीपाच्या मध्यभागी वलयाकार पर्वत असून त्याला ओलंडून जाणे शक्य होत नाही. म्हणूनच या पर्वताचे नाव मानुषोत्तर पर्वत असे आहे. जंबूव्दीप, घातकीखंड,व पुष्करार्धाचा अर्धा भाग मिळून असलेल्या या अडीच व्दीपसागराला ‘लोक’ असे म्हणतात. जंबूव्दीपामध्ये सात क्षेत्रविभाग आहेत. त्यांच्या सीमा सहा कुलपर्वतांच्या साह्याने ठरविण्यात आल्या आहेत. या क्षेत्रांची व कुलपर्वतांची नावे पुढीलप्रमाणे आहेत- भरत, हैमवत, हरि, विदेह, रम्यक, हैरण्यवत व ऐरावत ही क्षेत्रांची नावे असून हिमवन, महाहिमवन, निषध, नील,रुक्मि व शिखरी अशी पर्वतांची नावे आहेत. यातील विदेह क्षेत्र सर्वात मोठे असून त्या क्षेत्राच्या मध्यभागी ‘मेरु’ पर्वत आहे. या क्षेत्रातून विविध नद्या उगम पावत असल्याचाही उल्लेख मिळतो. उदा.-भरत क्षेत्रातील गंगानदी हिमवन नावाच्या पर्वतात उगम पावते. पूर्वेकडून वहात जाऊन ती शेवटी लवण समुद्राला मिळते. त्याचप्रमाणे याच पर्वतात सिंधू नदी उगम पावून पश्चिमेकडे वहात जाऊन शेवटी लवण समुद्रातच

विलीन होते. या नद्या व पर्वतांच्यामुळे भरतक्षेत्राचे एकूण सहा खंडात विभाजन झाले आहे. या सहा खंडाना जिंकून जो राजा त्यांना आपल्या ताब्यात ठेवतो त्याला चक्रवर्ती असे म्हणतात.

या मध्यलोकाच्या एक राजू प्रमाण उंचीवर त्या पुढील सात राजू प्रमाण असलेल्या ऊर्ध्व विस्ताराला ऊर्ध्वलोक असे म्हटले आहे. मध्य लोकामध्ये सर्वात प्रथम दिशेला ज्योर्तिलोक आढळतो. तेथे सूर्य, चंद्र, ग्रह, नक्षत्र, प्रकीर्णतारका यांचे अस्तित्व आहे. त्यावर विविध प्रकारचे १६ स्वर्ग आहेत. ते म्हणजे सौधर्म, ईशान, सानत्कुमार, माहेद्र, ब्रह्म, ब्रह्मोत्तर, लांतव, कापिष्ठ, शुक्र, महाशुक्र, शतार, सहस्त्रार, आनत, प्राणत, आरण व अच्युत हे होत. तेथे राहणा-या देवांचे इंद्र, सामाजिक, त्रायस्त्रिंश, पारिषद, आत्मरक्ष, लोकपाल, अनीक, प्रकीर्णक, आभियोग्य व किल्बिषक असे. उत्तरोत्तर हीनावस्थादर्शक दहा कल्परुप विभाग मानले आहेत. या सोळा स्वर्गानंतर ९ ग्रैवेयक, विजय, वैजयंत, जयंत, अपराजित, सवार्थसिध्दि ही पाच कल्पातीत विमाने आहेत. सवार्थसिध्दि नंतर लोकाकाशाचा शेवटचा भाग लागतो. जेथे जे मुक्तामे असतात ते स्थिर होतात. या भागापर्यंतच धर्मद्रव्य असल्यामुळे त्याचा पुढे जीव अथवा अन्य द्रव्ये प्रवेश करु शकत नाहीत.

मध्यलोक विस्तारानंतर मध्यलोकाच्या खाली सात राजू प्रमाण अधोलोक आहे. या अधोलोकात एकूण सात नरक आहेत. ते क्रमशः रत्नप्रभा, शर्कराप्रभा, वालुकाप्रभा, पंकप्रभा, धूमप्रभा, तमप्रभा व महातमप्रभा या नावाने ओळखले जातात. या नरकांच्या नावाप्रमाणेच त्यांचा वर्ण आहे. पापी जीव या विविध नरकामध्ये आत्यंतिक दुःख भोगत पडलेले असतात. त्यांना क्षुधा, तहान, उष्णता, ज्वाला, थंडी यांचे असह्य दुःख भोगावे लागते.

करणानुयोगाच्या विविध ग्रंथातून भौगोलिक स्थितीचे वर्णन झाल्यानंतर सर्वसाधारणपणे कालविषयक माहिति दिलेली आढळते. कालस्थितीचे एकूण १२ विभाग पाडले आहेत. जंबूव्दीपातील भरतक्षेत्रामध्ये अवसर्पिणी व उत्सर्पिर्णी कालचक्रानुसार सुषमा-सुषमा, सुषमा, सुषमा-दुषमा, दुषमा-सुषमा, दुषमा, दुषमा-दुषमा असे कालाचे १२ भाग पाडले आहेत. प्रथमच्या तीन कालविभागामध्ये भोगभूमीची रचना असते. तेथील मानवाच्या सर्व गरजा आपोआप कल्पवृक्षाकडून भागतात. भोगभूमीचा भाग संपल्यानंतर कर्मभूमीची सुरुवात सुषमा-दुषमा काळाच्या शेवटी होते. या काळात प्रतिश्रुति, सन्मति, क्षेमंकर, सीमांधर, विमलवाहन, चक्षुषमान्, यशस्वी, अभिचंद्र, चंद्राभ, मरुदेव, प्रसेनजित, नाभिराज, नाभिराज असे एकूण चौदा कुलधर होतात. त्यातील नाभिराज याने असि, मसि, कृषि, सेवा, शिल्प व वाणिज्य या षट्कर्माची व्यवस्था केली. त्यानंतर दुषमा-सुषमा नावाच्या चौथ्या कालात ऋषभादि चोविस तीर्थकर, बारा चक्रवर्ती, नऊ वासुदेव, नऊ वासुदेव आणि नऊ प्रतिवासुदेव असे त्रेसष्ट शलाकापुरुष होऊन गेले. अंतिम तीर्थंकर महावीर यांच्या निर्वाणानंतर दुषमा हा पंचमकाल सुरु असून तो अद्याप आहे. करणानुयोगातील ग्रंथात आलेला विषय येथे सारांशाने सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

या अनुयोगातील ग्रंथाचे सूक्ष्मपणे अवलोकन केले तर, सर्वच ग्रंथात वरील विषय आलेले आपणाला दिसून येत नाहीत. काही ग्रंथातून लोकविषयक, तर काही ग्रंथातून कालविषयक चर्चा केलेली आढळते. अगदी थोडक्या ग्रंथातून वरील सर्व विषयांचे सविस्तर वर्णन केलेले देखील आढळते. या सर्व विषयांचे कथन करीत असताना त्यांचे आपणाला एक वैशिष्ठ्य असे दिसून येते की, यात गणिती प्रक्रियांचा बराच वापर केला आहे.

म्हणूनच या ग्रंथाच्या साह्याने आपणाला तत्कालीन गणित शास्त्राची देखील माहिती मिळू शकते. करणानुयोगातील काही प्रमुख ग्रंथांचे विवेचन पुढे आले आहे.

१. **लोकविभाग-** करणानुयोगातील दिगंबर परंपरेनुसार हा सर्वात प्राचीन ग्रंथ मानला जातो. आज हा ग्रंथ उपलब्ध नाही. तिलोयपण्णत्तिकारापुढे 'लोकविभाग' हा ग्रंथ उपलब्ध असावा. कारण तसा उल्लेख या ग्रंथातून मिळतो. परंतु या ग्रंथाच्या कर्त्याविषयी, कालाविषयी अथवा त्याच्या स्थलाविषयी काही माहिती मिळू शकत नाही. परंतु याच ग्रंथाचे संस्कृत रुपांतर नंतरच्या सिंहसूरीकृत 'लोकविभाग' या ग्रंथात मिळते. या ग्रंथाची रचना ११ व्या या शतकानंतर करण्यात आली असावी.कारण या ग्रंथात अनेक ठिकाणी तिलोयपण्णत्ति, आदिपुराण, जंबूव्दीवपण्णत्ति, त्रिलोकसार या ग्रंथाचा स्पष्टपणे नामोल्लेख मिळतो. मूळ 'लोकविभाग' हा ग्रंथ प्राकृतमध्येच असावा. हा ग्रंथ पल्लववंशी राजा सिंहवर्मा याच्या कारकिर्दीत शके ३८० मध्ये सर्वनंदी मुनीनी लिहिला असावा.

'लोकविभाग' या ग्रंथाचेच संक्षिप्त भाषांतर आपण सादर करीत आहोत असे सिंहसूरिऋषींनी देखील म्हटले आहे.या ग्रंथात एकूण ११ प्रकरणे आहेत. १. जंबूव्दीपविभाग २. लवणसमुद्रविभाग ३. मानुषक्षेत्रविभाग ४ व्दीप-समुद्रविभाग ५. कालविभाग ६. ज्योतिर्लोकविभाग ७. भवनवासिलोकविभाग ८. अधोलोकविभाग ९. स्वर्गविभाग १० मोक्षविभाग या ग्रंथातील सर्व श्लोकांची संख्या २००० इतकी आहे.

२. **तिलोसपण्णत्ति-** त्रिलोकप्रज्ञप्ति हा भारतीय साहित्याचा एक प्राचीन ग्रंथ आहे. त्रिलोकासंबंधी सर्व गोष्टींचे व्यवस्थितपणे वर्णन करणारा हाच एक आधारभूत ग्रंथ मानला जातो. या ग्रंथाची रचना प्राकृत भाषेत असून प्रसंगानुरुप त्यात धार्मिक व सांस्कृतिक गोष्टींचेही विवेचन केले आहे. तो जास्तीतजास्त पद्यात्मक असून काही ठिकाणी गद्यात्मक भागाचाही वापर करण्यात आला आहे. हा ग्रंथ एकूण ९ महाधिकारात विभागला गेला आहे.

१.सामान्य लोकाचे स्वरुप २. नारकलोक ३. भवनवासीलोक ४. मनुष्यलोक ५. तिर्यग्लोक ६. व्यंतरलोक ७. ज्योतिर्लोक ८. देवलोक ९. सिध्दलोक या ग्रंथांची रुपलेखा अत्यंत सुंदर असून महाधिकाराचे पुनः अधिकारात विभाजन करुन विविध विषयांचे सखोल विवेचन केले आहे.

त्रिलोकप्रज्ञप्ति या ग्रंथाचे कर्ते आ. यतिवृषभाचार्य असून त्यांनीच कषायप्राभृत या सैध्दांतिक ग्रंथावर चूर्णी लिहिली आहे. त्यांनी आपल्या या ग्रंथात गाथेशिवाय स्त्रग्धरा, इंद्रव्रजा, उपजाति, दोधक, शार्दुलविक्रीडीत, वसंततिलका व मालिनी या छंदाचाही वापर केला आहे. या ग्रंथात एकूण ५६७७ इतकी गाथा संख्या आहे. या श्रेष्ठ ग्रंथामध्ये त्रेसष्ठ शलाका पुरुषांची ऐतिहासिक माहिती व कल्कि राजाच्या कालापर्यंची राजवंश परंपरा कथन केली आहे. जयधवला टीकेत वीरसेनानी या ग्रंथाचा वारंवार उल्लेख केला आहे. या ग्रंथाची सर्वसाधारणपणे इ.स. ५०० ते ८०० च्या मध्यंतरास झाल्याचे मानण्यात येते.

**त्रिलोकसार-**

प्रस्तुत ग्रंथाची रचना आ. नेमिचंद्र सिध्दांतचक्रवर्ती यांनी ११ ऋया शतकात केली आहे. त्यात एकूण १०१८ प्राकृत गाथा आहेत. या ग्रंथात एकूण सहा अधिकार आहेत- १. सामान्यलोक, २. भवनलोक, ३. व्यंतरलोक, ४. ज्योतिर्लोक, ५. वैमानिकलोक व ६. नर-तिर्यक् लोकांचे वर्णन केले आहे. त्यातील गाथांची संख्या क्रमशः २०७, ४२, ५२, १४६, ११०, ४५८. इतकी आहे.

१. **सामान्यलोक-** सहा द्रव्यांनी व्याप्त प्रदेशाला सामान्यलोक म्हणतात. लोकाचे अधो, मध्य व ऊर्ध्व असे तीन प्रमुख विभाग आहेत. अर्धमृदंगावर दुसरा मृदंग उभा करुन जसा आकार होईल तसाच लोकाचा आकार आहे. हा लोक आकाशाच्या मध्यभागी स्थित आहे. आकाशाचे लोकाकाश व अलोककाश असे दोन भाग आहेत.

२. **भवनलोक-** यात असूरकुमार-नागकुमार इत्यादि दहा प्रकारचे देव राहतात. त्यांच्याविषयीची माहिती या अधिकारात दिली आहे.

३. **व्यंतरलोक-** यात किन्नर किम्पुरुषादि आठ प्रकारच्या व्यंतर देवांची माहिती दिली आहे.

४. **ज्योतिर्लोक-** यात चंद्र,सूर्य, ग्रह, नक्षत्र, तारे आणि प्रकीर्णक या पाच ज्योतिषी देवांचे वर्णन केले आहे. प्रथमतः मध्यलोकातील अंतर्गत १६ व बाह्य १६ व्दीपांचा उल्लेख केला आहे.

त्यांनतर जंबूव्दीपाचे सविस्तर वर्णन करुन, ज्योतिषांचे स्थान, विमान, संचार, ताप, तमक्षेत्र, अधिकमास, दक्षिण-उत्तरायण यांचे वर्णन केले आहे.

५. **वैमानिकलोक-** या अधिकारात १६ कल्पांच्या नावाचा उल्लेख करुन १२ इंद्र, ९ ग्रैवेयक, ९ अनुदिश, ५ अनुत्तर विमानाची माहिती, देवदेवतांचे स्वरुप व वैभव यांचे विवेचन केले आहे.

६. **नरतिर्यग्लोक-**या अधिकारात सहा कुलपर्वत, त्यावरील तलाव, तलावामध्ये वास्तव्य करणा-या देवी, त्यांचा परिवार, तलावातून निघणा-या गंगा-सिंधूदि १४ नद्या, क्षेत्र पर्वतादिंचा गणितात्मक रितीने सांगितलेला विस्तार, विदेह क्षेत्र, वन, शलाका-पुरुष इत्यादींचे वर्णन केले आहे. शेवटी नंदीश्वरव्दीपातील ५२ जिनभावांचा उल्लेख करुन त्यांची पूजा इंद्रकडून केली जात असल्याचा उल्लेख केला आहे.

या प्रत्येक अधिकाराच्या प्रारंभी ग्रंथकाराने जिनभवनांना वंदना केली आहे. सर्वात शेवटी आपल्या अलपमताविषयी कृतज्ञता प्रकट करुन अभयनंदीचे उपकार मानून बहुश्रुत आचार्यानी त्याबद्दल क्षमा करावी अशी विनंती केली आहे.

**जंबूदीवपण्णत्ती-**

प्रस्तुत ग्रंथाची रचना पद्मनंदी आचार्यानी केली आहे. त्याचा काळ विक्रम ११ वे शतक मानला जातो. या ग्रंथाची रचना तिलोयपण्णत्ती ग्रंथाच्या आधारे केली असावी. या ग्रंथात एकूण १३ उद्देश्य असून गाथांची संख्या २४२९ इतकी आहे. ग्रंथातील विषयांचे क्रमशः विवेचन खालीलप्रमाणे आहे.

१. **उपोद्घात प्रस्ताव-** या ग्रंथाच्या प्रारंभी पंचगुरुना व आचार्यांना नमस्कार करुन ग्रंथ लिहिण्याची प्रतिज्ञा पद्यनंदीनी केली आहे. त्यानंतर भ. वर्धमानाला नमस्कार करुन केवलिंना श्रुतकेवलींना आचारांगधारकाना व आचार्यांना नमस्कार केला आहे. पुढे समस्त व्दीप सागरांच्या संख्येच्या निर्देशाबरोबरच क्षेत्र पर्वतादि संख्याचाही निर्देश केला आहे. या विभागात एकूण ७४ गाथा आहेत.

२. **भरतैरावतवर्ष वर्णन-** यात भरतादि सात क्षेत्र व त्यांना विभाजित करणा-या हिमवान आदि सहा कुलपर्वतांचा उल्लेख केला आहे. त्याचबरोबर अवसर्पिणी व उत्सर्पिणी कालांचीही चर्चा केली आहे.

३. **पर्वत-नदी भोगभूमि वर्णन-** या विभागात कुलपर्वत, मानुषोत्तर, कुंडल, नद्या, हैमवतादि क्षेत्रातील भोगभूमींचे वर्णन केले आहे. यात गाथा संख्या २४६ इतकी आहे.

४. **सुदर्शन मेरु-** यात मंदर पर्वतावरील जिनभवनाचा उल्लेख करुन तीर्थंकरांच्या जन्माभिषेकासाठी येणा-या सौधर्मादि इंद्राचे वर्णन केले आहे. यात २९२ गाथा आहेत.

५. **मंदर जिनवरभवन-** वरील विभागाप्रमाणेच यात मंदर पर्वतावर स्थित जिनभवनाचे वर्णन करुन नंदीश्वर व्दीप, कुंडल पर्वत, मानुषोत्तर पर्वत आणि रुचक पर्वतावर स्थित जिनभवनाचे वर्णन केले आहे. अष्टान्हिक पर्वात जिनपूजनासाठी येणा-या १६ इंद्रची शोभा वर्णिली आहे. त्यांच्याव्दारे केल्या जाणा-या पूजा महोत्सवाचे सुंदर वर्णन केले आहे. यात १२५ गाथा आहेत.

६. **देवकुरु-उत्तरकुरु-** येथे विदेह क्षेत्रातील देवकुरु व उत्तरकुरु क्षेत्राचे विस्तार कथन करुन त्यात उत्पन्न होणा-या मनुष्यांची माहिती दिली आहे. यात १७८ गाथा आहेत.

७. **विदेह वर्ष-** यात वनखंड देवारण्ये, वेदिका, विभंगा नद्या, वक्षारपर्वत, कच्छा विजय त्यातील क्षेमा नगरी यांचे वर्णन केले आहे. यात १५३ गाथा आहेत.

८. **पूर्वविदेह विभाग-** वरील विषयांचेच यात विवेचन केले असून यात एकूण १९८ गाथा आहेत.

९. **अपरविदेह-** पूर्वविदेहातील कच्छादिप्रमाणेच येथे रत्न संचयाने युक्त नगरीचे आणि पद्मा इत्यादि विजयांचे वर्णन केले आहे. यात १९७ गाथा आहेत.

**लवणसमुद्र विभाग-** येथे लवणसमुद्रच्या विवेचनाबरोबर विविध पाताळांचे आणि कृष्ण-शुक्ल पक्षात होणा-या हानि-वृध्दीचे विवेचन केले आहे. यात १०२ गाथा आहेत.